ePaper पंतप्रधानांच्या फोटोला काळे फासले, युवक कॉंग्रेसचे कुणाल राऊत यांना अटक!

| वर्ष - 7 | अंक - 263 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 05 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



### आतील पानांत


- क्रिकेटच्या मैदानात दिसले अनोखे दृश्य
- अभिज्ञा भावे संतापली
- भाजपात जाण्यासाठी माझ्यावर दबाव
- मिंध्याला खेचून आणला असता


## महापालिका योजनांचा लाभ देण्यासाठी

# विकसित भारत संकल्प यात्रा!

## 25 फेब्रुवारी कालावधीत "विकसित भारत संकल्प यात्रा" चे आयोजन

। पिंपरी- चिंचवड
।महाईन्यूज

**महापालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ४२ ठिकाणी विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन केले आहे. योजनांच्या पात्र लाभार्थ्यांची यादी अंतिम करणे, त्यांचे आधार कार्डसह एकत्रितकरण आणि लाभार्थ्यांना योजनांशी जोडण्यात येणार आहे.**




पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील विकसित भारत संकल्प यात्रेचा २१ दिवसांचा दुसरा टप्पा ५ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. २५ फेब्रुवारी कालावधीत "विकसित भारत संकल्प यात्रा" चे आयोजन केले आहे. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे 'विकसित भारत संकल्प यात्रा' वाहनाचे उद्घाटन सोमवारी दुपारी ३ वाजता आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते होणार आहे.

नगर विकास विभागाकडून केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री पथविक्रता आत्मनिर्भर निधी (पीएम स्वनिधी), प्रधानमंत्री आवास योजना (नागरी), स्वच्छ भारत अभियान (नागरी), प्रधानमंत्री ई- बस, सेवा व अमृत योजना यांसह अनेक योजना राबविल्या जातात, या योजना तळागाळातील लोकांपर्यंत

> वाहन यात्रा उद्यापासून मनपाच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ४२ ठिकाणी काढण्यात येणार आहे. यात्रेद्वारे योजनांच्या लाभार्थ्यांची ऑनबोर्डिंग करणे, पात्र लाभार्थ्यांची यादी अंतिम करणे, त्यांचा तपशील आधार कार्डसह एकत्रित करणे, लाभार्थ्यांना योजनांशी जोडणी करणे यासह इतर योजनांसाठी महापालिका अधिकारी, कर्मचा-यांच्या सहकार्यातून मोहिम राबण्यात येईल. **-शेखर सिंह, महापालिका आयुक्त पिंपरी-चिंचवड**

### काय आहे विकसित भारत संकल्प यात्रा?



भारत सरकारच्या महत्वाकांक्षी योजनांचा लाभ वंचित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'विकसित भारत संकल्प यात्रा' ही मोहीम 15 नोव्हेंबरपासून सुरू करण्यात आली आहे. मोहिमेअंतर्गत केंद्र शासनाच्या योजनांची माहिती देणारा चित्ररथ जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी भागात फिरविला जात असून त्या माध्यमातून लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा यशस्वी प्रयत्न होत आहे. जनजातीय गौरव दिनापासून सुरू झालेली ही यात्रा पहिल्या टप्प्यात लक्षणीय अनुसूचित जमाती लोकसंख्या असलेल्या देशातील 110 जिल्ह्यात सुरू करण्यात आली. यात पुणे जिल्ह्यासह पिंपरी-चिंचवड शहराचा समावेश आहे. यात्रेच्या निमित्ताने लाभार्थ्यांशी संवाद देखील साधण्यात येत आहे.

---

## लोकसभेच्या मावळच्या जागेवरून बारणे-शेळके यांच्यात कलगीतुरा!

## महायुतीत शिवसेना लढणार की राष्ट्रवादी अजित पवार गट लढणार अशी संभ्रमावस्था

। तळेगाव दाभाडे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकीत मावळ मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार म्हणून विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी उमेदवारी अगोदरच जाहीर केली आहे. त्यानंतर ही जागा राष्ट्रवादी कॉंग्रेसला (अजित पवार) मिळावी आमदार सुनील शेळके यांनी दावा ठोकला. यामुळे ही जागा महायुतीत शिवसेना लढणार की राष्ट्रवादी अजित पवार गट लढणार अशी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. महायुतीतच मावळच्या जागेसाठी बारणे विरुद्ध शेळके यांच्यात कलगीतुरा रंगू लागला आहे.**




मावळ लोकसभेची जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाला मिळाली पाहिजे, याचा पुनरुच्चार सुनील शेळके यांनी शनिवारी पुन्हा केला. राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मावळसाठी आणलेल्या निधीची माहिती शेळके यांनी दिली.

खासदार बारणे यांच्यासोबत आपले वैर नाही. मात्र, केवळ तिसऱ्यांदा उमेदवारी मागताना केलेल्या कामाचा अहवाल बारणे यांनी द्यावा, महायुतीचा कोणीही उमेदवार असो, मग ते बारणे असले तरी पक्षाच्या आदेशानुसार काम करू, असेही शेळके यांनी सांगितले.

> उमेदवारी मागण्याचा अधिकार प्रत्येक पक्षाला आहे. माझ्या उमेदवारीबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर सकारात्मक चर्चा झालेली आहे. त्यामुळे मला माझ्या उमेदवारीबाबत चिंता नाही. **-श्रीरंग बारणे, खासदार**

# तुम्हाला भावनिक बनवण्याचा प्रयत्न

## शरद पवार यांच्यावर अत्यंत कठोर शब्दांमध्ये टीका

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसला खिंडार पाडून भाजपच्या मांडीला मांडी लावून बसल्यानंतर अजित पवार यांनी आता बारामती लोकसभेसाठी थेट रणशिंग फुंकलं आहे. आज (4 फेब्रुवारी) बारामती दौऱ्यामध्ये अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर अत्यंत कठोर शब्दांमध्ये टीका करतानाच बारामतीसाठी मीच उभा आहे असं समजून मी देणाऱ्या उमेदवाराला मतदान करा, असं आवाहन केले.**





त्यांनी या माध्यमातून बारामती लोकसभा निवडणूक लढवण्याचे स्पष्ट केले. बारामतीमधून सुप्रिया सुळे या खासदार आहेत. त्यामुळे त्यांच्या विरोधात आता अजित पवार यांच्या घरामधील उमेदवार असणार की अन्य कोणाचे नाव समोर येणार याबाबत अजून स्पष्टता नसली, तरी अजित पवार गटाकडून बारामतीमधून त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार लोकसभा निवडणूक लढवण्यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. बारामती लोकसभेसाठी सुनिता पवार यांचे नाव चर्चेत आहे. तसं झाल्यास बारामती लोकसभेला नणंद विरुद्ध भावजय असा घरातून संघर्ष होण्याची दाट शक्यता आहे. बारामतीमध्ये बोलताना अजित पवार यांनी शरद पवार यांच्यावर घणाघाती टीका केली. ते म्हणाले की, आज वातावरण मोदींना संधी द्यावी या पद्धतीनेच आहे. शेती, घरकुल अशा खूप योजना त्यांनी आणल्या आहेत. भारताचे नाव जगामध्ये उंचावले आहे. बारामतीमध्ये कामे मी सरकारमध्ये असल्याने ती कामे होत आहेत. आपल्या विचाराचा खासदार झाल्यास आपली कामं झाली पाहिजेत हे मला सांगता येईल. त्यांनी नुसतं एस म्हटल्यास मोठा निधी मिळतो. आपला खासदार झाल्यावर आपलं रेल्वे स्टेशन कसे करतो बघा असं आश्वासने त्यांनी दिले. आपल्या विचाराचा खासदार असल्यानंतर फरक पडे. तुम्हाला भावनिक बनवण्याचा प्रयत्न केला जाईल. तिकडे अजितला द्या, आता इकडे या असं म्हटलं जाईल. अजितचे म्हणणे असे आहे की, तिकडे आणि इकडेही अजितला द्या. जर मीठाचा खडा टाकला, तर मी आमदारकीच्या बाबतीत पण विचार करेल असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. त्यामुळे काय करायचं ते तुम्ही ठरवा. दरम्यान यावेळी आपण घेतलेली भूमिका कशी योग्य हे सुद्धा त्यांनी पटवून देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. ते म्हणाले की मी राजकीय भूमिका घेतली आहे. मी पाचव्यांदा उपमुख्यमंत्री झाल्यावर बारामतीमध्ये माझे अशा पद्धतीने स्वागत करतील, असे वाटले नव्हते. अनेक मिरवणूक बघितल्या, वरिष्ठांच्या बघितल्या पण असं स्वागत कधी झालं नव्हतं. एकनाथ शिंदे यांनी भूमिका घेतल्यानंतर नको नको ते शब्द वापरण्यात आले. मात्र, आपण भूमिका घेतल्यानंतर एक शब्द कोणी बोललं नाही असाही दावा अजित पवार यांनी बारामतीमध्ये बोलताना केला. सगळेच भूमिका घेणार होते, हवं तर खासगीत विचारा, असा सुद्धा दावा अजित पवार यांनी केला. आम्ही एनडीएच्या आघाडीत आहोत. आपण सगळ्यांचे नेतृत्व बघून सुरुवातीच्या काळात आम्ही मोदींवर टीका केली. मात्र, विचारधारा सोडली नाही.

### शरद पवार यांच्यावर टीका

» फुले, शाहू, आंबेडकर यांचा विचार घेऊन पुढे चाललो आहोत. छगन भुजबळ, हसन मुश्रीफ या सगळ्यांनी भूमिका घेतल्याचे ते यावेळी म्हणाले.त्यांनी या माध्यमातून बारामती लोकसभा निवडणूक लढवण्याचे स्पष्ट केले. बारामतीमधून सुप्रिया सुळे या खासदार आहेत. त्यामुळे त्यांच्या विरोधात आता अजित पवार यांच्या घरामधील उमेदवार असणार की अन्य कोणाचे नाव समोर येणार याबाबत अजून स्पष्टता नसली, तरी अजित पवार गटाकडून बारामतीमधून त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार लोकसभा निवडणूक लढवण्यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. बारामती लोकसभेसाठी सुनिता पवार यांचे नाव चर्चेत आहे. तसं झाल्यास बारामती लोकसभेला नणंद विरुद्ध भावजय असा घरातून संघर्ष होण्याची दाट शक्यता आहे. बारामतीमध्ये बोलताना अजित पवार यांनी शरद पवार यांच्यावर घणाघाती टीका केली.

# ज्ञानोबा-तुकोबांचे विचार देशभरात पोहचेल!

## गीताभक्ती अमृत महोत्सवात गोविंददेव महाराज यांचे प्रतिपादन

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाढदिवस हे केवळ निमित्त आहे, या निमित्ताने ज्ञानोबा-तुकारामांच्या विचार देशभरात पोहोचेल. विश्व कल्याणाचा व समन्वयाचा, शांती आणि प्रेमाचा संदेश आपल्या सर्व संतानी दिला. महाराष्ट्राचे संत शिरोमणी ज्ञानदेवांच्या भूमित हा कार्यक्रम होत असल्याचा आनंद असल्याचे मत गोविंददेव गिरिजी महाराज यांनी गीताभक्ति अमृत महोत्सवात व्यक्त केले.**



आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण धर्मरक्षा आणि राष्ट्र निर्माणासाठी समर्पित करणारे पूज्य स्वामी श्रीगोविन्ददेव गिरिजी महाराज स्वामी विवेकानंदांसारख्या संत परंपरेचे प्रचारक आहेत. दरवर्षी पूज्य स्वामीजींचा जन्मदिवस गीताभक्ति दिवस म्हणून साजरा केला जातो. मात्र यावर्षी स्वामीजींच्या दिव्य जीवनाची ७५ वर्ष पूर्ण होत असल्याने संलग्न संस्थांनी 'गीताभक्ति अमृत महोत्सवा'चे आयोजन केले आहे. रविवारी (दि. ४) सकाळी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींना अभिषेक व त्यानंतर वारकरी सत्कार, यज्ञ विधीचा शुभारंभ व कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. गीता परिवार, महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान, श्रीकृष्ण सेवानिधी व संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुल या संस्थानी गीताभक्ती अमृतमहोत्सव सोहळ्याचे आयोजन करुन भारतीय संस्कृती आणि परंपरेचा अनोखा मेळ घातल्याचेही स्वामीजींनी यावेळी सांगितले. आजच्या कार्यक्रमाला वारकरी संप्रदायासह पूज्य स्वामी श्रीगोविन्ददेव गिरिजी महाराज यांना मानणारे हजारो भाविक उपस्थित होते.श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे कोषाध्यक्ष, राष्ट्रसंत पूज्य स्वामी श्रीगोविन्ददेव गिरिजी महाराज यांच्या ७५ व्या जन्मसोहळ्यानिमित्त आळंदीनगरी सज्ज झाली आहे. रविवारी सकाळी मलुक पीठ, वृंदावनचे संत राजेंद्रदास महाराज यांचे उपस्थितीत धार्मिक अनुष्ठान करण्यात आले. यावेळी देशभरातील साधुसंतांच्या उपस्थितीने इंद्रायणीकाठी संतांचा मेळा भरल्याचीच अनुभूती मिळत होती.

### संतानी दिला प्रेमाचा संदेश

» जवळपास १५ हजारांहून अधिक भाविकांच्या उपस्थितीत सकाळी ज्ञानेश्वर माऊलींना अभिषेक व त्यानंतर झालेल्या वारकरी सन्मान सोहळ्याने शुभारंभ झालेला गीताभक्ति अमृत महोत्सव ११ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे.आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण धर्मरक्षा आणि राष्ट्र निर्माणासाठी समर्पित करणारे पूज्य स्वामी श्रीगोविन्ददेव गिरिजी महाराज स्वामी विवेकानंदांसारख्या संत परंपरेचे प्रचारक आहेत. दरवर्षी पूज्य स्वामीजींचा जन्मदिवस गीताभक्ति दिवस म्हणून साजरा केला जातो. मात्र यावर्षी स्वामीजींच्या दिव्य जीवनाची ७५ वर्ष पूर्ण होत असल्याने संलग्न संस्थांनी 'गीताभक्ति अमृत महोत्सवा'चे आयोजन केले आहे. . विश्व कल्याणाचा व समन्वयाचा, शांती आणि प्रेमाचा संदेश आपल्या सर्व संतानी दिला.

## आमदार महेश लांडगे यांची वाटचाल

# प्रखर हिंदूत्त्ववादाच्या दिशेने!

### हिंदूत्त्ववादी मोहीमा, संघटनांचा जनसंपर्क वाढला

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान केल्याबद्दल समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांना सभागृहात खडे बोल सुनावणारे भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी प्रखर हिंदूत्वाच्या दिशेने आपली राजकीय वाटचाल सुरू केली आहे.**



अयोध्येतील राम मंदिर उद्घाटनानिमित्त महाराष्ट्रातील सर्वात मोठी रथयात्रा पिंपरी-चिंचवडमध्ये आमदार लांडगे यांच्या पुढाकाराने काढण्यात आली. त्यानंतर लगेचच मिरवणुकीमध्ये हिंदू तरुणांवर झालेल्या हल्ल्याचा समाचार घेण्यासाठी सोलापूर दौरा काढण्यात आला. त्यावेळी “ विनाकारण हिंदू तरुणांना त्रास देण्याचा कोणी प्रयत्न केला. त्याला जशास तसे उत्तर देण्यात येईल. हात उगारला...तर हात काढण्यात येईल..” असे प्रक्षोभक विधान त्यांनी केल्याने पुन्हा एकदा राज्यात चर्चेचा विषय ठरला.

आमदार लांडगे यांनी काही महिन्यांपूर्वी काढलेली सावरकर गौरव यात्रा लक्षणीय ठरली. त्यानंतर अबू आझमी यांना खडे बोल सुनावले. त्यामुळे ते राज्यातील घराघरामध्ये पोहोचले. श्री शिवप्रतिष्ठान हिंदूस्थान आणि भिडे गुरूजी यांच्या सर्वच कार्यक्रमात त्यांची उपस्थिती आणि सक्रिय सहभाग पहायला मिळतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये झालेल्या गडकोट मोहिमेमध्येही त्यांनी सहभाग घेतला.

भारतातील सर्वात मोठे देशी गोवंश प्रदर्शन भरवून त्यांनी गोरक्षक अर्थात पुन्हा हिंदू संस्कृती संवर्धन व प्रचारासाठी पुढाकार घेतला होता. आळंदी, चाकणसह पुणे जिल्ह्यातील धर्मांतर आणि गोहत्या सारख्या विषयांवर आमदार लांडगे यांनी वेळोवेळी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली. पुण्यातील पुण्येश्वर मंदिर परिसरात अतिक्रमणाच्या मुद्यावर त्यांची भूमिका लक्षवेधी ठरली. यासह पुणे व राज्यातील काही भागांमध्ये दहशतवादी कारवाया आणि तपास यंत्रणा यांची भूमिका या बाबत त्यांनी सभागृहात प्रखरपणे भूमिका मांडलेली पहायला मिळाली.

### ‘स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण’चे संकल्पक...

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वात मोठा पुतळा ‘स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण’ उभारण्याचे कार्य आमदार लांडगे यांनी हाती घेतले आहे. संभाजी महाराज यांचे समाधीस्थळ वढू तुळापूर येथील महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रम व सोयी-सुविधांसाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या पुढाकाराने ५ लाख रुपयांना निधी देण्याची तरतूदही आमदार लांडगे यांनी करुन घेतली. देव-देश आणि धर्मासाठी प्रखरपणे लढणाऱ्या राज्यातील आघाडीच्या हिंदूत्ववादी नेत्यांमध्ये आमदार लांडगे यांचे नाव आवर्जुन घेतले जात आहे.

---

## पिंपरी-चिंचवडमधील सहा लाख कुटुंबांचे सर्वेक्षण!

### मुदतीमध्ये सर्वेक्षण पूर्ण झाल्याचा दावा

।पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील सुमारे सहा लाख घरांना भेटी देऊन मराठा आणि खुल्या प्रवर्गातील कुटुंबांचे सर्वेक्षण शुक्रवारअखेर मुदतीमध्ये पूर्ण करण्यात आले आहे. शेवटच्या तीन दिवसांत ११ टक्के सर्वेक्षण केल्यामुळे मुदतीमध्ये सर्वेक्षण पूर्ण झाल्याचा दावा सहायक नोडल अधिकारी अविनाश शिंदे यांनी केला.**




शहरात २३ जानेवारीपासून सर्वेक्षण सुरू करण्यात आले होते. या सर्वेक्षणासाठी महापालिकेने दोन हजार १४३ अधिकारी, कर्मचारी नेमले होते. सर्वेक्षणाची पहिली मुदत ३१ जानेवारीला संपली होती. मात्र, सर्वेक्षण बाकी असल्याने महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने दोन दिवसांची मुदत वाढवून दिली होती. शुक्रवार सायंकाळअखेर शहरातील सहा लाख घरांना भेटी देऊन सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे.

नोंदींची माहिती मागासवर्ग आयोगाच्या सर्व्हरवर जमा करण्यात आली आहे. सुरुवातीला सर्व्हर डाऊन होणे, लॉगइनसह अनेक तांत्रिक अडचणी आल्या होत्या. तर, काही भागांमध्ये जात विचारल्यामुळे सर्वेक्षणास विरोध झाल्याचे समोर आले होते.

सर्वेक्षणासाठी प्रगणक, सुपर वायझर, नोडल अधिकारी, लिपिक असे दोन हजार १४३ अधिकारी, कर्मचारी नियुक्त केले होते. शहरातील सहा लाख घरांना भेटी देऊन दिलेल्या मुदतीमध्ये शंभर टक्के सर्वेक्षण पूर्ण करण्यात आल्याचा दावा शिंदे यांनी केला.

## नौशाद शेखवर आणखी एक गुन्हा

### मुलीसोबत गैरवर्तन करून विनयभंग केला

।पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दहावीतील अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी बेड्या ठोकण्यात आलेल्या नौशाद अहमद शेख (वय 58) याच्याविरोधात शनिवारी (दि. 3) आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला.**



शेख याच्या शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन मुलीसोबत गैरवर्तन करून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पीडित विद्यार्थिनीने याप्रकरणी रावेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख याने पीडित मुलीसोबत गैरवर्तन करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केले. अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला. याबाबत मुलीने भितीपोटी कोणालाही काही सांगितले नाही. दरम्यान, शेख याने लैंगिक अत्याचार केल्याची तक्रार एका अल्पवयीन विद्यार्थिनीने केली. त्यानुसार 30 जानेवारी रोजी रावेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.


त्यानंतर पोलिसांनी शेख याला अटक केली. त्याला सोमवारपर्यंत (दि. 5) पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांनी क्रिएटिव्ह अॅकॅडमी या निवासी शाळेतील विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांशी चर्चा केली. तसेच त्यांचे समुपदेशन करून गैरप्रकार झाला असल्यास तक्रारीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले.

त्यामुळे पीडित विद्यार्थिनीने गैरप्रकार झाल्याचे सांगितले. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रावेत पोलीस तपास करीत आहेत.




**काही आठवडयांपूर्वी या स्तंभातील एका लेखात मी कायद्याचे राज्य असणे आणि कायद्याने राज्य करणे यातील फरक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. कायद्याचे राज्य असणे या संकल्पनेत कायदा सर्वोच्च असतो आणि सर्व राज्यकर्ते त्याला बांधील असतात. कायद्याने राज्य करणे या संकल्पनेत राज्यकर्ते सर्वोच्च असतात आणि कायदा त्यांचा सेवक असतो आणि सेवकाला कधीही बदलता येते.**

# ‘त्यांच्या’ राजकारणाचे नियमच वेगळे!



वस्ती करणे आणि समुदायाने राहणे या कल्पना रुजल्यापासून मानवाने जगण्यासंदर्भातले नियम करायला आणि अंगीकारायला सुरुवात केली. तथापि, व्हिएतनाम, इराक आणि लिबियामधील युद्धांमध्ये या नियमांचे उल्लंघन करण्यात आले. रशिया आणि युक्रेन तसेच इस्रायल आणि हमास यांच्यात सुरू असलेल्या युद्धांमध्ये या नियमांचे उल्लंघन केले जाते. बलात्कार आणि लूटमार सर्रास सुरू आहे. रशियाने युक्रेनमधील रुग्णालये, शाळा आणि नागरी वस्त्यांवर बॉम्बफेक तसेच क्षेपणास्त्र हल्ले केले आहेत. २४ जानेवारी २०२४ रोजी ६५ युक्रेनियन युद्धकैदी आणि नऊ कर्मचारी घेऊन जाणारे एक रशियन विमान पाडण्यात आले आणि विमानातील सर्व लोकांचा मृत्यू झाला. रशियाने केलेला दहशतवादी कृत्याचा आरोप युक्रेनने फेटाळला आहे. इस्रायल-हमास युद्धात, हमासने ७ ऑक्टोबर, २०२३ रोजी सध्याचा संघर्ष सुरू केला. गाझामधून दक्षिण इस्रायलवर अचानक हल्ला केला. त्यात १२०० हून अधिक लोक मारले गेले आणि २४० जणांना ओलीस केले गेले. गेले चार महिने इस्रायलनेही अत्यंत कडवा आणि जोरदार प्रतिकार केला आहे. अरुंद गाझा पट्टीत पॅलेस्टिनींची कोंडी केली आहे आणि २५ हजार जण ठार झाल्याची नोंद आहे. या दोन्ही युद्धांमध्ये चारही बाजूंनी प्रत्येक नियमाचे उल्लंघन झाले आहे. युद्धाच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास, व्यक्ती आणि राज्यांवर संयुक्त राष्ट्रांच्या न्यायालयात खटला चालवला जाऊ शकतो. गाझामध्ये नरसंहार कराराचे उल्लंघन केल्याबद्दल दक्षिण आफ्रिकेने इस्रायलला आंतरराष्ट्रीय न्यायालयात खेचले आहे. प्रेमातल्या नियमांवर बरीच पुस्तके आहेत. मला तर वाटतं की जितके प्रेमिक, तितके नियम आणि तितकी पुस्तकं आहेत. रुल्स ऑफ लव्ह किंवा प्रेमाचे नियम हे अशा लोकप्रिय पुस्तकांचे शीर्षक असू शकते. ‘प्रेमाचे सामान्य नियम’, ‘प्रेमाचे आठ नियम’, ‘प्रेमाचे ४० नियम’ अशी प्रेमावरील पुस्तकांची यादी आहे. मी त्यापैकी एकही पुस्तक वाचलेले नाही, हे मी कबूल करतो. पण अशा पुस्तकांचा एक मोठा वाचकवर्ग आहे. राजकारणाच्या बाबतीत, राजकारणाचे नियम असणे आणि नियमाने राजकारण करणे यात गोंधळ होऊ नये. कायदा ही वेगळी गोष्ट आहे आणि नियम (ज्या पद्धतीने खेळ खेळला जातो) ही वेगळी गोष्ट आहे. खरे तर, काही सामन्यांमध्ये, अस्तित्वात असलेल्या नियमांना पराभूत करण्यासाठीच अस्तित्वात नसलेल्या नियमांनुसार खेळ खेळला जातो. उदाहरणार्थ, राजकीय पक्षांच्या पक्षांतरांना प्रतिबंध करणारा कायदा अशा प्रकारे वापरला जातो की त्यामुळे अधिक पक्षांतरांना प्रोत्साहन मिळेल. राजकारणातल्या नियमांनुसार तर पंचदेखील एका बाजूकडून खेळात भाग घेऊ शकतात. पक्षांतराच्या खेळात विधानसभाध्यक्ष सहभागी झाले अशीही अनेक प्रकरणे आहेत. शिवाय, साधी गोष्ट गुंतागुंतीच्या पद्धतीने समजावून सांगितली पाहिजे, हा राजकारणाचा नियम आहे. जेव्हा तुम्हाला एखाद्याबद्दल आसक्ती वाटते, तेव्हा त्यातून बाहेर पडणे सोपे असते, पण जेव्हा तुम्ही प्रेमात पडता तेव्हा ते त्यातून बाहेर पडणे आणि पुन्हा उभे राहणे अशक्य असते. – अल्बर्ट आइनस्टाईन यातली काही विधाने विनोदीही असतील पण ती प्रेमाचे काही किमान नियम सांगतात. तिरुक्कुरल (ख्रिस्तपूर्व ५०० वर्षे) या माझ्या आवडत्या रचनेमध्ये तत्कालीन तत्त्वज्ञ कवीने प्रेमावर एक पूर्ण विभाग लिहिला आहे. त्यात प्रेमावर २५ प्रकरणे आणि २५० कडवी आहेत. त्यातल्या या काही रचना पहा म्हणजे प्रेमातले नियम तुमच्याही लक्षात येतील. वस्ती करणे आणि समुदायाने राहणे या कल्पना रुजल्यापासून मानवाने जगण्यासंदर्भातले नियम करायला आणि अंगीकारायला सुरुवात केली. तथापि, व्हिएतनाम, इराक आणि लिबियामधील युद्धांमध्ये या नियमांचे उल्लंघन करण्यात आले.

## संपादकीय »

# ताळेबंदांचा तोल!

***कंपन्यांच्या आर्थिक लेखाजोख्यात वाढ होते आहे खरी, पण ही वाढ गेल्या ४२ महिन्यांतील सर्वात मंद असणे हे अर्थव्यवस्था मंदावल्याचे लक्षण...***

सध्याच्या उत्सवी आणि उत्साही वातावरणाचा आनंद घेत असतानाही एका तपशिलाकडे दुर्लक्ष करणे शहाण्यांस अवघड जाईल. हा तपशील म्हणजे गेल्या काही दिवसांत जाहीर झालेले जवळपास २०० कंपन्यांचे यंदाच्या आर्थिक वर्षातील तिसऱ्या तिमाहीचे ताळेबंद. आपल्याकडील नियमानुसार भांडवली बाजारात सूचिबद्ध कंपन्यांस दर तीन महिन्यांनी बाजारपेठ नियंत्रकास, म्हणजे ‘सेबी’स (सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया), सरत्या तीन महिन्यांचा ताळेबंद सादर करावा लागतो. उत्पन्न, खर्च, देणे आणि येणे इत्यादी किमान तपशील त्यात असतो आणि तो सनदी लेखापालाने मंजूर केलेला असलेच असे नाही. या अशा तिमाही ताळेबंदात त्याची तुलना त्याआधीच्या तिमाहीशी, गेल्या वर्षातील कामगिरीशी केली जाते. त्यामुळे ३० जून, ३० सप्टेंबर, ३१ डिसेंबर आणि ३१ मार्च या दिवशी अनुक्रमे पहिली, दुसरी, तिसरी आणि अखेरची तिमाही संपते.

**प्रत्येक संस्थेची एक कहाणी आहे आणि ती आपल्या सर्वांना नीतीचा, चांगुलपणाचा आणि सद्भावाचा दिलासा देणारी आहे. त्यासाठी ‘लोकसत्ता’ने स्वत:चा वापर माध्यम म्हणून करणे ही फार मोठी गोष्ट आहे. कारण इतर सनसनाटी बातम्या येतच असतात.**

# आधार देणारे अदृश्य खांब हीच खरी संपत्ती

पण या उपक्रमामुळे समाजामध्ये समाजाच्या भल्यासाठी काम करणारी इतकी सारी मंडळी आहेत, हे कळते. या संस्थांनी आपल्या देण्यामधून काय घ्यायचे, तर शाबासकीची थाप. या उपक्रमातून त्यांना असे वाटते की माझ्या पाठीशी कुणीतरी उभे आहे आणि ते फक्त शब्दरूपात नाहीयेत. कारण सामाजिक सहभागातून भरघोस रक्कम निर्माण होणे, ही गोष्ट फारच महत्त्वाची आहे. सर्व संस्थांना तो दिलासा सामूहिक कृतीमधून मिळत असतो आणि तो त्यांच्याकरिता प्राणवायूच आहे. एखादी संस्था चालवणे हे कधीच सोपे नसते. या सर्व संस्थांकडे मनोधैर्य, स्वत:च्या ध्येयाची बांधिलकी असते. पण त्या कामासाठी लागणारा पैसा कुठून आणायचा हे कळत नसते. आपण या संस्थांना मदत केली नसती तरीही त्यांचे काम सुरू राहणारच होते. त्यामुळे आम्ही मदत केली आणि तुमचे कार्य चालू राहिले ही भावना नसावी. आपण जी मदत करतो ती स्वत:साठी आहे. त्या माध्यमातून आपल्या मनामधला



सद्भाव जागा होतो. त्यातून या संस्थांना पुढे जाण्यासाठीची उमेद मिळते. विनोबा असे म्हणतात की ‘दान आणि त्याग’ या दोन्ही गोष्टी धर्माच्या आहेत. दानाची जागा ही धर्माच्या पर्वताच्या पायथ्याशी आहे. तर, त्यागाची जागा ही त्या पर्वताच्या माथ्याशी आहे.

‘लोकसत्ता सर्वकार्येषु सर्वदा’च्या माध्यमातून हितचिंतकांनी केलेले दान म्हणजे त्याग आहे. त्यागाची आरती ही ज्ञानाने करायची असते. या सर्व सेवाभावी संस्था याही धर्माच्या पर्वताच्या माथ्यावर आहेत. सर्व दाते हे या पर्वताच्या पायथ्याशी आहेत. दानाच्या माध्यमातून त्यांच्याकडे पाहून त्यांच्या त्यागाची कदर करून आपण त्यांना दाद देतो. यानिमित्ताने आपण सर्वजण सद्भावाला वंदन करतो. सत्पात्री केलेले दान हे इतरत्र कळू नये, असे सांगितले आहे. अलीकडे दानापेक्षाही दातृत्वाची जास्त जाहिरात पाहण्याची सवय आपल्याला झालेली आहे. ‘सर्वकार्येषु सर्वदा’च्या माध्यमातून दिलेले दान हे सर्व दात्यांनी स्वइच्छेने दिलेले आहे. अनेक हितचिंतक या उपक्रमाशी बांधले गेले आहेत. त्यामुळे हे दान खूप महत्त्वाचे आहे. यज्ञ हा दुसरा शब्द आहे. यज्ञ शब्दाचा अर्थ स्वत:ची मालकी सोडणे असा होतो.

त्यामुळे कोणतीही गोष्ट यज्ञ वृत्तीने करा म्हणजे संस्कृत भाषेतील उक्तीनुसार ‘इदं न मम’. याचा अर्थ असा की, हे माझे नव्हे. यज्ञ वृत्ती म्हणजे सेवा करणाऱ्या व्यक्तींनी कर्तृत्वावरची मालकी सोडलेली आहे. कोणत्याही स्वार्थाशिवाय ते समाजासाठी काम करत आहेत. स्वत: कर्तृत्व करून त्याचे श्रेय मात्र कमीत कमी घ्यायचे, याला यज्ञ म्हणतात. दान करणाऱ्या व्यक्तींसाठी स्वत:च्या भोगतृत्वावरची मालकी सोडणे हा यज्ञ आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# त्या मिंध्याला कुठूनही खेचून आणला असता!

## उद्धव ठाकरे: विधानसभेवर आपल्या भगव्याची प्रतिष्ठापना करायची आहे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माजी मुख्यमंत्री तथा शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचा सध्या कुटुंब संवाद दौरा चालू आहे. यानिमित्त उद्धव ठाकरे यांनी रविवारी (४ फेब्रुवारी) कणकवली येथील जनतेशी संवाद साधला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी कोकणातील जनतेला आगामी निवडणुकीत ठाकरे सेनेला साथ देण्याची विनंती केली.**




माजी मुख्यमंत्र्यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारतीय जनता पार्टी आणि राज्य सरकारवर जोरदार टीका केली. उद्धव ठाकरे यांनी कणकवलीच्या सभेत बोलताना जून २०२२ मध्ये शिवसेनेत पडलेल्या फूटीवर भाष्य केलं. उद्धव ठाकरे म्हणाले, माझे आमदार फूटत आहेत याची मला कल्पना होती. परंतु, हे नासके आंबे मला माझ्या पेटीत नको होते. त्यामुळे मी ते जाऊ दिले. उद्धव ठाकरे म्हणाले, आपल्याला महाराष्ट्राच्या विधानसभेवर आपल्या भगव्याची प्रतिष्ठापना करायची आहे. त्याचबरोबर दिल्लीच्या तख्तावरही आपला भगवा फडकवायचा आहे. असं केल्यास तो आपल्यासाठी यशाचा एक क्षण असेल. असे हे क्षण आपण छत्रपती शिवाजी महाराजांकडून मागून घेत आहोत. मला सामान्य शिवसैनिकाला मुख्यमंत्री करायचं आहे. मी मुख्यमंत्री झालो होतो. त्यावेळी नाईलाजाने मला ते पद स्वीकारावं लागलं होतं. कारण माझे परतीचे दोर कापले गेले होते.ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले, मुख्यमंत्रिपद सोडताना मी जराही विचार केला नाही की हे पद कसं सोडू... मला जर त्या पदाला चिकटून राहायचं असतं तर मी चिकटून राहू शकलो असतो. मला काय कळलं नव्हतं माझे आमदार फुटतायत ते... त्यांना पकडून मी हॉटेलात टाकू शकलो नसतो का? त्या मिंद्याचं काय... त्याला कुठूनही धरून, खेचून आणला असता... पण मला हे सडके आंबे नको होते. आंब्याच्या पेटीत एक जरी नासका आंबा असेल तर अख्खी पेटी नासते. म्हणून मी सर्वात आधी नासके आंबे उचलून फेकून दिले.माजी मुख्यमंत्री म्हणाले, मी माझ्या पेटीतले नासके आंबे फेकून दिले आहेत आणि आता आपल्याबरोबर हे मर्द आहेत. मर्दासारखे मर्द आपल्यासाठी उभे आहेत. हे मर्द जोपर्यंत माझ्याबरोबर आहेत तोवर मला कोणाचीही परवा नाही. मी लढायला उभा आहे, फक्त तुम्ही (जनता) माझी साथ देणार की नाही? या कणकवली मतदारसंघात तुम्ही मला विजय देणार आहात की नाही? या मतदार संघातसुद्धा आपला जो उमेदवार असेल त्याला तुम्हाला विजयी करावंच लागेल. ही सगळी कोकणची किनारपट्टी आपल्याला भगवी करायची आहे. इथे आपले खासदार तर आहेतच, आता आणखी काही आमदार निवडून आणायचे आहेत.माजी मुख्यमंत्री तथा शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचा सध्या कुटुंब संवाद दौरा चालू आहे. यानिमित्त उद्धव ठाकरे यांनी रविवारी (४ फेब्रुवारी) कणकवली येथील जनतेशी संवाद साधला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी कोकणातील जनतेला आगामी निवडणुकीत ठाकरे सेनेला साथ देण्याची विनंती केली. उद्धव ठाकरे म्हणाले, आपल्याला महाराष्ट्राच्या विधानसभेवर आपल्या भगव्याची प्रतिष्ठापना करायची आहे.

### मला काय कळलं नव्हतं

» माजी मुख्यमंत्र्यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारतीय जनता पार्टी आणि राज्य सरकारवर जोरदार टीका केली. उद्धव ठाकरे यांनी कणकवलीच्या सभेत बोलताना जून २०२२ मध्ये शिवसेनेत पडलेल्या फूटीवर भाष्य केलं. उद्धव ठाकरे म्हणाले, माझे आमदार फूटत आहेत याची मला कल्पना होती. परंतु, हे नासके आंबे मला माझ्या पेटीत नको होते. त्यामुळे मी ते जाऊ दिले.उद्धव ठाकरे म्हणाले, आपल्याला महाराष्ट्राच्या विधानसभेवर आपल्या भगव्याची प्रतिष्ठापना करायची आहे. त्याचबरोबर दिल्लीच्या तख्तावरही आपला भगवा फडकवायचा आहे. असं केल्यास तो आपल्यासाठी यशाचा एक क्षण असेल. असे हे क्षण आपण छत्रपती शिवाजी महाराजांकडून मागून घेत आहोत. मला सामान्य शिवसैनिकाला मुख्यमंत्री करायचं आहे. मी मुख्यमंत्री झालो होतो. त्यावेळी नाईलाजाने मला ते पद स्वीकारावं लागलं होतं. कारण माझे परतीचे दोर कापले गेले होते.ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले, मुख्यमंत्रिपद सोडताना मी जराही विचार केला नाही की हे पद कसं सोडू... मला जर त्या पदाला चिकटून राहायचं असतं तर मी चिकटून राहू शकलो असतो. मला काय कळलं नव्हतं माझे आमदार फुटतायत ते... त्यांना पकडून मी हॉटेलात टाकू शकलो नसतो का?

# राजीनामा दिल्यानंतर कॅबिनेटमध्ये काय घडलं?

## मी अडीच महिन्यांपूर्वीच मंत्रिपदाचा राजीनामा दिला : भुजबळ

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील शिंदे-फडणवीस-पवार सरकारने मराठा आंदोलकांच्या मागण्या मान्य केल्यापासून राज्यभरातले ओबीसी नेते आक्रमक झाले आहेत. ओबीसी नेते तथा राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सातत्याने राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यामुळे भुजबळ यांच्यावर सातत्याने टीका होत आहे.**





राज्य सरकारविरोधात भूमिका असतील तर भुजबळांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधकांकडून होत आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांविरोधात भूमिका घेतल्याने महायुतीतले काही नेते भुजबळांविरोधात आक्रमक झाले आहेत. शिवसेनेच्या शिंदे गटातील आमदार संजय गायकवाड यांनी भुजबळांवर शेलक्या शब्दांत टीका केली. संजय गायकवाड म्हणाले, “भुजबळांच्या कमरेत लाथ घालून त्यांना मंत्रिमंडळाबाहेर काढलं पाहिजे.” या टीकेनंतर छगन भुजबळ यांनी त्यांच्या राजीनाम्याबाबत मोठा गौप्यस्फोट केला. अहमदनगर येथे आयोजित ओबीसी एल्गार मेळाव्यात बोलताना छगन भुजबळ म्हणाले, मी अडीच महिन्यांपूर्वीच मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. त्या रॅलीच्या एक दिवस आधी, म्हणजेच १६ नोव्हेंबर रोजी मी माझ्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. मी आधी राजीनामा दिला आणि मगच आंबडच्या सभेसाठी रवाना झालो. त्यामुळे मला लाथा घालायची गरज नाही. दरम्यान, भुजबळ यांनी राजीनामा राज्यपालांकडे का दिला नाही? त्यांचा राजीनामा मुख्यमंत्र्यांनी का स्वीकारला नाही? राजीनाम्यानंतर कॅबिनेटमध्ये काय घडलं? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या प्रश्नांना छगन भुजबळ यांनी उत्तर दिलं आहे. मंत्री छगन भुजबळ म्हणाले, मी १७ नोव्हेंबर रोजी आंबडच्या ओबीसी एल्गार सभेला जाण्यापूर्वी मुख्यमंत्र्यांच्या नावाने माझा राजीनामा लिहून तो अजित पवारांच्या कार्यालयाला पाठवून दिला होता.

### भुजबळच्या कमरेत लाथ घाला

» सभेला जाताना या राजीनाम्याची कुठेही वाच्यता करू नका असा निरोप मला पाठवण्यात आला. त्यामुळे मी सभेत राजीनाम्याची वाच्यता केली नाही. छगन भुजबळ म्हणाले, तिन्ही नेते मला म्हणाले की, तुमचं काम आणि ओबीसींबाबत मत मांडायला आमचा विरोध नाही. आपण शांततेत ओबीसींचं काम करायला पाहिजे. राजीनाम्याची वाच्यता करू नका. त्यानंतर अडीच महिने मी राजीनाम्याची वाच्यता केली नाही. त्यानंतर एक जण बोलला की, भुजबळच्या कमरेत लाथ घाला आणि त्याला मंत्रिमंडळाबाहेर बाहेर काढा.

# भाजपात जाण्यासाठी माझ्यावर दबाव!

## अरविंद केजरीवालांच्या वक्तव्यावर गौतम गंभीरचा टोला

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**विरोधी पक्षांमधील अनेक मोठे नेते सक्तवसुली संचालनालय, आयकर विभाग, गुन्हे अन्वेशन विभागासारख्या केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशीच्या फेऱ्यात अडकले आहेत. अशाच एका प्रकरणात झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना त्यांच्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यामागेही चौकशीचा ससेमिरा चालू आहे. अशातच केजरीवाल यांनी आज सत्ताधारी भारतीय जनता पार्टीवर गंभीर आरोप केले आहेत. भाजपात प्रवेश करण्यासाठी माझ्यावर दबाव टाकला जातोय, असं केजरीवाल म्हणाले. भाजपात गेल्यावर सगळे खून माफ होतात, आम्ही काहीही चुकीचं केलेलं नाही. काहीही झालं तरी आम्ही झुकणार नाही.**



केजरीवाल म्हणाले, "आजकाल हे लोक (भाजपा) आमच्या मागे लागले आहेत. तुम्ही वर्तमानपत्रांमध्ये वाचलंच असेल, मनीष सिसोदिया यांना भाजपाने तुरुंगात टाकलं आहे. हे म्हणतात सिसोदियांनी भ्रष्टाचार केला आहे. सकाळी सहा वाजता ते शाळा-शाळांमध्ये जायचे. कुठला भ्रष्टाचारी सकाळी शाळांमध्ये जातो. जो भ्रष्टाचार करतो तो मद्यपान करतो, त्याला इतरही अनेक प्रकारची व्यसनं असतात, त्याचबरोबर तो चुकीची कामं करतो. आम्ही यातलं काय केलं आहे? आम्ही दिल्लीच्या विकासासाठी काम करतोय. परंतु, हे लोक आमच्या मागे लागले आहेत.विरोधी पक्षांमधील अनेक मोठे नेते सक्तवसुली संचालनालय, आयकर विभाग, गुन्हे अन्वेशन विभागासारख्या केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशीच्या फेऱ्यात अडकले आहेत. अशाच एका प्रकरणात झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना त्यांच्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यामागेही चौकशीचा ससेमिरा चालू आहे. अशातच केजरीवाल यांनी आज सत्ताधारी भारतीय जनता पार्टीवर गंभीर आरोप केले आहेत. भाजपात प्रवेश करण्यासाठी माझ्यावर दबाव टाकला जातोय, असं केजरीवाल म्हणाले. भाजपात गेल्यावर सगळे खून माफ होतात, आम्ही काहीही चुकीचं केलेलं नाही. काहीही झालं तरी आम्ही झुकणार नाही. अशातच पूर्व दिल्ली मतदारसंघाचे खासदार आणि केजरीवाल यांचे विरोधक, माजी क्रिकेटपटू गौतम गंभीर यांनी केजरीवाल यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. गंभीर म्हणाले, सक्तवसुली संचालनालय, आयकर विभाग किंवा गुन्हे अन्वेशन विभागासारख्या ज्या शासकीय संस्था आहेत, त्यांना त्यांचं काम करू द्या. मला नेहमी असं वाटत आलं आहे की, जो खरा असतो तो निधड्या छातीने लढतो, तो पळून जात नाही आणि यालाच इमानदारी म्हटलं जातं. जो निधड्या छातीने लढतो तोच खरा योद्धा असतो. याउपर मी काहीच बोलू शकत नाही.अरविंद केजरीवाल म्हणाले, "त्यांनी (भाजपा) माझ्याविरोधात षडयंत्र रचलं आहे. आम्ही शाळा आणि रुग्णालयं बांधत आहोत तर त्यात आम्ही काय चुकीचं केलं. तुम्ही या अरविंद केजरीवालला तुरुंगात पाठवा. तुम्ही आज आमचं काहीही बिघडवू शकत नाही. गरीब मुलांसाठी आम्ही शाळा उभारल्या. त्यांच्या आई-वडिलांचे आशीर्वाद हीच आमची ताकद आहे. ज्यांच्या मागे गरीबांचे आशीर्वाद असतात त्यांच्यामागे देवही उभा राहतो. तुम्ही कितीही षडयंत्र रचा, मी इथे सामोरा जायला उभा आहे. मी तुमच्यासमोर झुकणार नाही.आम आदमी पार्टीचे प्रमुख केजरीवाल म्हणाले, "आजकाल हे लोक (भाजपा) आमच्या मागे लागले आहेत. तुम्ही वर्तमानपत्रांमध्ये वाचलंच असेल, मनीष सिसोदिया यांना भाजपाने तुरुंगात टाकलं आहे. हे म्हणतात सिसोदियांनी भ्रष्टाचार केला आहे. सकाळी सहा वाजता ते शाळा-शाळांमध्ये जायचे. कुठला भ्रष्टाचारी सकाळी शाळांमध्ये जातो. जो भ्रष्टाचार करतो तो मद्यपान करतो, त्याला इतरही अनेक प्रकारची व्यसनं असतात, त्याचबरोबर तो चुकीची कामं करतो. आम्ही यातलं काय केलं आहे? आम्ही दिल्लीच्या विकासासाठी काम करतोय. परंतु, हे लोक आमच्या मागे लागले आहेत.विरोधी पक्षांमधील अनेक मोठे नेते सक्तवसुली संचालनालय, आयकर विभाग, गुन्हे अन्वेशन विभागासारख्या केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशीच्या फेऱ्यात अडकले आहेत.

### माझ्याविरोधात षडयंत्रं रचलं

अशाच एका प्रकरणात झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना त्यांच्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यामागेही चौकशीचा ससेमिरा चालू आहे. अशातच केजरीवाल यांनी आज सत्ताधारी भारतीय जनता पार्टीवर गंभीर आरोप केले आहेत. भाजपात प्रवेश करण्यासाठी माझ्यावर दबाव टाकला जातोय, असं केजरीवाल म्हणाले. भाजपात गेल्यावर सगळे खून माफ होतात, आम्ही काहीही चुकीचं केलेलं नाही. काहीही झालं तरी आम्ही झुकणार नाही.अशातच पूर्व दिल्ली मतदारसंघाचे खासदार आणि केजरीवाल यांचे विरोधक, माजी क्रिकेटपटू गौतम गंभीर यांनी केजरीवाल यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. गंभीर म्हणाले, सक्तवसुली संचालनालय, आयकर विभाग किंवा गुन्हे अन्वेशन विभागासारख्या ज्या शासकीय संस्था आहेत, त्यांना त्यांचं काम करू द्या. मला नेहमी असं वाटत आलं आहे की, जो खरा असतो तो निधड्या छातीने लढतो, तो पळून जात नाही आणि यालाच इमानदारी म्हटलं जातं. जो निधड्या छातीने लढतो तोच खरा योद्धा असतो. याउपर मी काहीच बोलू शकत नाही.अरविंद केजरीवाल म्हणाले, "त्यांनी (भाजपा) माझ्याविरोधात षडयंत्रं रचलं आहे.

---

# भारतीय दूतावासातील कर्मचारी हनी ट्रॅपच्या जाळ्यात


## परराष्ट्र मंत्रालयातील एका कर्मचाऱ्याला उत्तर प्रदेशमधून अटक

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**उत्तर प्रदेशमधील दहशतवादी विरोधी पथकाने भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या एका कर्मचाऱ्याला उत्तर प्रदेशच्या मेरठ येथे अटक केली आहे. हा कर्मचारी रशियाची राजधानी मॉस्कोमधील भारतीय दूतावास कार्यालयात कार्यरत असताना त्याने पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेसाठी काम केले, असा आरोप त्यावर ठेवण्यात आला आहे.**

सत्येंद्र सिवल असे नाव असलेल्या कर्मचाऱ्याने २०२१ साली मॉस्कोमधील दूतावासात काम केले होते. सत्येंद्र सिवलने भारतीय लष्कर आणि काही गुप्त धोरणांची माहिती पाकिस्तानला दिली, असे चौकशीतून समोर आले आहे. पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेने सत्येंद्र सिवलला हनी ट्रॅपच्या माध्यमातून जाळ्यात ओढले, असे सांगितले जाते. त्यानंतर पाकिस्तानच्या इशाऱ्यावर त्याने भारताशी निगडित गुप्त माहिती फोडण्याचे काम केले. एवढेच नाही तर सत्येंद्र सिवल इतर कर्मचाऱ्यांनाही या हेरगिरीच्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करत होता. उत्तर प्रदेश एटीएससह आता केंद्रीय तपास यंत्रणाही सत्येंद्र




सिवलची चौकशी करत आहेत. या चौकशीतून आणखी माहिती बाहेर येण्याची शक्यता आहे.एटीएसच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मॉस्कोमध्ये तैनात असताना सत्येंद्र सिवल फेसबुकच्या माध्यमातून एका महिलेच्या संपर्कात आला. तिथून मेसेंजरच्या माध्यमातून त्यांच्यात संवाद सुरू झाला. त्यानंतर मोबाइल नंबर एकमेकांना देऊन व्हॉट्सअपवर त्यांचे बोलणे होऊ लागले. हनी ट्रॅप करणाऱ्या महिलेने स्वतःला रिसर्चर असल्याचे सांगून सिवलकडून दूतावासातील माहिती मिळवली.गुप्तचर संस्था आयएसआयचे गुप्तचर त्यांच्या हस्तकांमार्फत भारतीय परराष्ट्र मंत्रालयातर्फे दूतावासात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पैशांचे आमिष देऊन भारतीय लष्कर आणि गुप्त धोरणांची माहिती मिळविण्याचा प्रयत्न करत आहेत.

### हनीट्रॅप म्हणजे काय?

ऑनलाईन मैत्री, पैसे किंवा लैंगिक संबंधाचे आमिष दाखवून गोपनीय माहिती मिळवण्याच्या पद्धतीला हनीट्रॅप म्हणतात. या गैरप्रकारातून मिळवलेल्या माहितीचा वापर आर्थिक घोटाळ्यांसाठी, राजकीय उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अथवा देशांमध्ये हेरगिरी करण्यासाठी केला जातो. काही वेळा खंडणी किंवा ब्लॅकमेलिंगच्या उद्देशानेही हनीट्रॅप लावले जातात.उत्तर प्रदेशमधील दहशतवादी विरोधी पथकाने भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या एका कर्मचाऱ्याला उत्तर प्रदेशच्या मेरठ येथे अटक केली आहे. हा कर्मचारी रशियाची राजधानी मॉस्कोमधील भारतीय दूतावास कार्यालयात कार्यरत असताना त्याने पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेसाठी काम केले, असा आरोप त्यावर ठेवण्यात आला आहे.

# शाहीद कपूरही साकारणार छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका

सध्या बॉलिवूड अभिनेत्यांना मराठी चित्रपटांची भुरळ पडली असून, बऱ्याच महापुरुषांच्या भूमिका येत्या काळात बॉलिवूड कलाकार साकारताना दिसणार आहेत. मध्यंतरी महेश मांजरेकर यांच्या आगामी ‘वेडात मराठे वीर दौडले सात’ या चित्रपटातील अक्षय कुमारचा छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेतील लुक चांगलाच व्हायरल झाला होता. नुकतंच या चित्रपटाचं चित्रीकरणही सुरू झालं असून प्रेक्षक अक्षय कुमारला महाराजांच्या भूमिकेत पाहण्यास फारच उत्सुक आहेत. याबरोबरच ‘सॅम बहादुर’सारख्या ताकदीच्या भूमिका पेलणारा विकी कौशलही लवकरच लक्ष्मण उतेकर यांच्या आगामी ‘छावा’ या चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात विकी कौशल छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका साकारणार आहे. विकीचा या चित्रपटासाठीचा लुकची सध्या चांगलाच चर्चेत आहे. आता अक्षय आणि विकीपाठोपाठ आणखी एक बॉलिवूड अभिनेता छत्रपतींच्या भूमिकेत आपल्याला पाहायला मिळण्याची शक्यता आहे.‘पिंकव्हीला’च्या वृत्तानुसार ‘ओह माय गॉड २’चे दिग्दर्शक अमित राय हे लवकरच छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर एक भव्य चित्रपट घेऊन येणार आहेत.



या चित्रपटात अमित राय शाहीद कपूरला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भूमिकेत घेणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकूणच चित्रपटाशी जोडलेल्या काही निर्मात्यांनासुद्धा शाहिदच या भूमिकेसाठी योग्य वाटत आहे. शाहिद कपूरनेही या प्रोजेक्टमध्ये रुची दर्शवली आहे.अद्याप चित्रपटाच्या घोषणेबद्दल कोणतीही माहिती समोर आलेली नसून एका मोठ्या निर्मात्याची सगळेच वाट बघत आहेत. त्यामुळे लवकरच या चित्रपटाची घोषणा होण्याची शक्यता आहे. गेल्या दोन वर्षांपासून शाहीद कपूर हा वेगवेगळ्या भूमिका स्वीकारत असल्याने त्याच्याकडून लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत त्यामुळेच या भूमिकेसाठी शाहिदचा विचार केला जात आहे. लवकरच शाहिद क्रीती सेनॉनबरोबरच्या ‘तेरी बातों में ऐसा उलझा जिया’ या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर पुन्हा एंट्री घेणार आहे.

## पती सॅम बॉम्बेने केलं पूनमच्या पब्लिसिटी स्टंटचं समर्थन

बॉलिवूड अभिनेत्री व मॉडेल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पूनम पांडेचं सरव्हायकल कॅन्सरमुळे (गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग) निधन झाल्याची माहिती शुक्रवारी (२ फेब्रुवारी) तिच्या टीमकडून देण्यात आली होती. तिच्या मॅनेजरने यासंदर्भात सविस्तर इन्स्टाग्राम पोस्ट शेअर केली होती. यानंतर अभिनेत्रीच्या निधनाबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. तिच्या कुटुंबीयांकडून कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नव्हती. त्यामुळे एकंदरीत पूनमच्या मृत्यूचं गूढ आणखी वाढत चाललं होतं. अखेर या २४ तास सुरू असलेल्या नाट्यमय घडामोडींनंतर पूनम पांडे जिवंत असल्याचं समोर आलं.पूनम पांडेने स्वत: इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत यासंदर्भात माहिती दिली आहे. “मी जिवंत आहे, कर्करोगामुळे माझा मृत्यू झालेला नाही” असं तिने या व्हिडीओद्वारे स्पष्ट केलं आहे.

## अभिज्ञा भावे संतापली

प्रसिद्ध मॉडेल व बॉलीवूड अभिनेत्री पूनम पांडेने स्वत:च्या मृत्यूचा खोटा पब्लिसिटी स्टंट केल्याने सध्या सोशल मीडियावर तिच्याविरोधात संतापाची लाट उसळली आहे. इंडस्ट्रीमधील बऱ्याच कलाकारांनी घडल्या प्रकाराबाबत नाराजी व्यक्त करत पूनमला खडेबोल सुनावले आहेत. मराठीसह हिंदी मालिकांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी अभिनेत्री अभिज्ञा भावेने देखील पूनमवर सडकून टीका केली आहे.स्वत:च्या मृत्यूचा स्टंट केल्यामुळे अभिज्ञाने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत पूनम पांडेवर टीका केली आहे. अभिज्ञा लिहिते, “सध्या माझ्या मनात फक्त तिरस्कार, राग आणि निराशजनक भावना आहेत. सोशल मीडिया या प्रभावी माध्यमाला एकप्रकारे विनोद बनवून ठेवलं आहे. या सगळ्या गोष्टी फक्त लक्ष वेधून घेण्यासाठी केल्या जातात. कर्करोग म्हणजे विनोद नाहीये…खूप मोठा आजार आहे. शिवाय अशाप्रकारची पीआर ॲक्टिव्हिटी देखील असूच शकत नाही. ज्या लोकांनी या आजारपणाच्या वेदना सहन केल्या आहेत त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांनाच याची भीषणता काय असते याची माहिती आहे.”“ज्या व्यक्तिने हे एवढं मोठं नाट्य रचलं तिला आणि तिच्या कुटुंबीयांना या आजारपणाची झळ कधीही बसू नये.



## आयरा खान-नुपूर शिखरेचे फोटो व्हायरल

बॉलीवूडचा ‘मिस्टर परफेक्शनिस्ट’ अभिनेता आमिर खानची लेक आयरा खानने बॉयफ्रेंड नुपूर शिखरेबरोबर ३ जानेवारीला नोंदणी पद्धतीत लग्न केलं. त्यानंतर उदयपूरमध्ये १० जानेवारीला मोठ्या थाटामाटात ख्रिश्चन पद्धतीत दोघांचं लग्न झालं. याचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले होते. अशातच नुकतेच आयराने इंडोनेशियातील हनिमूनचे फोटो शेअर केले आहेत; जे सोशल मीडियावर चांगलेच चर्चेत आले आहेत. आयरा खानने हनिमूनचे फोटो शेअर करत लिहिल आहे, “तुमचा हनीमून कसा होता?…. आय लव्ह यू नुपुर शिखरे. एक महिना, ४ वर्ष, अंडरवॉटर, सकाळी ३ वाजता, अपसाइड डाउन, अँटी क्लाइमॅटिक, हायली क्लाइमॅटिक…जोपर्यंत तू आहेस तोपर्यंत काही वाटत नाही.”आयराने शेअर केलेल्या पहिल्या फोटोमध्ये ती नवरा नुपूरबरोबर पाहायला मिळत आहे. यावेळी आयराने आकाशी रंगाची बिकिनी घातली आहे. दुसऱ्या फोटोमध्ये नुपूर समुद्र किनारी हँडस्टँड करताना दिसत आहे. तिसऱ्या फोटोमध्ये आयरा-नुपूर सुमद्र किनारी बसलेले पाहायला मिळत आहेत. असे १० फोटो आयराने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या पोस्टवर नुपूरने “आय लव्ह यू आयरा” अशी प्रतिक्रिया दिली आहे.दरम्यान, आमिर खानचा जावई हा पेशाने फिटनेस ट्रेनर आणि डान्सर आहे. FITNESSISMची सुरुवात त्याने केली होती. नुपूरला फिटनेस तज्ञ आणि सल्लागार म्हणून ओळखले जाते. आमिर खान, आयराचा तो फिटनेस ट्रेनर होता. तसेच त्याने दशकभर सुष्मिता सेनला फिटनेस ट्रेनिंग दिलं आहे. याशिवाय नुपुर पुलकित सम्राट, राणा डग्गुबती आणि अनेक सेलिब्रिटींचा फिटनेस ट्रेनर आहे.



# पूनम पांडेच्या पब्लिसिटी बाबिची प्रतिक्रिया

बॉलिवूड अभिनेत्री व मॉडेल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पूनम पांडेचं सरव्हायकल कॅन्सरमुळे (गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग) निधन झाल्याची माहिती शुक्रवारी (२ फेब्रुवारी) तिच्या टीमकडून देण्यात आली होती. तिच्या मॅनेजरने यासंदर्भात सविस्तर इन्स्टाग्राम पोस्ट शेअर केली होती. यानंतर अभिनेत्रीच्या निधनाबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. तिच्या कुटुंबीयांकडून कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नव्हती. त्यामुळे एकंदरीत पूनमच्या मृत्यूचं गूढ आणखी वाढत चाललं होतं. अखेर या २४ तास सुरू असलेल्या नाट्यमय घडामोडींनंतर पूनम पांडे जिवंत असल्याचं समोर आलं. पूनम पांडेने स्वत: इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत यासंदर्भात माहिती दिली आहे. “मी जिवंत आहे, कर्करोगामुळे माझा मृत्यू झालेला नाही” असं तिने या व्हिडीओद्वारे स्पष्ट केलं आहे. याशिवाय यामध्ये तिने सर्वांची माफी मागितली आहे. सरव्हायकल कॅन्सर या गंभीर आजाराबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी पूनम आणि तिच्या पीआर टीमने हे पाऊल उचललं होतं हे तिने तिच्या सोशल मीडिया पोस्टमधून स्पष्ट केलं. तरुण मुलींनी या आजारावरची लस घ्यावी अन् त्याविषयी लोकांमध्ये चर्चा व्हावी यासाठी पूनमने स्वतःच्या मृत्यूचं हे नाटक रचल्याचं कबूल केलं.तिच्या या उत्तरानंतर सोशल मीडियावर तिला लोकांनी चांगलंच धारेवर धरलं आहे. इतक्या खालच्या थराला जाऊन केवळ पब्लिसिटीसाठी असा स्टंट करणाऱ्या पूनमला अटक करायला हवी अशी मागणी काहींनी केली आहे. मनोरंजनसृष्टीतील बऱ्याच लोकांनी पूनमची कानउघडणी केली आहे. बॉलिवूडचा दिवंगत अभिनेता इरफान खानचा मुलगा बाबिल खाननेही याबाबतीत टिप्पणी केली आहे.

# क्रिकेटच्या मैदानात दिसले अनोखे दृश्य!

## अफगाणिस्तानचे इब्राहिम झाद्रानने दुसऱ्या डावात शतक झळकावले

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**कोलंबो येथे २ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या श्रीलंका आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकमेव कसोटी सामन्यात अफगाणिस्तानच्या ४ खेळाडूंना पदार्पण कॅप मिळाली. यामध्ये मोहम्मद सलीम, नवीद झद्रान, झिया उर रहमान आणि नूर अली झाद्रान यांच्या नावांचा समावेश आहे. या चार खेळाडूंमध्ये, नूर अली झाद्रानचे पदार्पण सर्वात जास्त चर्चेत होते. कारण त्याला २२ वर्षीय इब्राहिम झाद्रानने पदार्पण कॅप दिली होती, जो नूर अली झाद्रानचा भाचा आहे. नूर अली झाद्रानने वयाच्या ३५ व्या वर्षी अफगाणिस्तानच्या कसोटी संघात पदार्पण केले.**



२२ वर्षांच्या पुतण्याने ३५ वर्षांच्या काकांना कसोटी पदार्पणाची कॅप दिली हे क्रिकेटच्या मैदानावरील हे दृश्य स्वतःच मनोरंजक होते. एवढेच नाही तर काका-पुतण्याने अफगाणिस्तानसाठी डावाची सलामीही दिली. पहिल्या डावात ही जोडी काही विशेष करू शकली नाही, पण दुसऱ्या डावात दोघांमध्ये शतकी भागीदारी झाली. नूर अली झाद्रान आणि इब्राहिम झाद्रान यांनी पहिल्या विकेटसाठी १०६ धावांची भागीदारी केली. ही भागीदारी नूरच्या विकेटसह तुटली. त्याने ४७ धावा केल्या.नूर अली झाद्रानने अफगाणिस्तानसाठी १४ वर्षे क्रिकेट खेळले आहे, पण या १४ वर्षांच्या करिअरमध्ये तो कसोटी पदार्पण करू शकला नाही. त्याला श्रीलंकेविरुद्ध अफगाणिस्तान कसोटी संघात पदार्पण करण्याची संधी मिळाली. विशेष म्हणजे त्याचा पुतण्या इब्राहिम झाद्रानने त्याला पदार्पणाची कॅप दिली. नूर अलीचा आणखी एक पुतण्या अफगाणिस्तानसाठी क्रिकेट खेळतो. त्या खेळाडूचे नाव आहे मुजीब उर रहमान. इब्राहिम झाद्राने श्रीलंकेविरुद्ध खेळल्या जात असलेल्या कसोटी सामन्यातील तिसऱ्या दिवशी शतक झळकावले. त्याने २१७ चेंडूचा सामना करताना ११ चौकारांच्या मदतीने नाबाद १०१ धावा केल्या. त्यामुळे अफगाणिस्तानचा संघ दुसऱ्या डावात तिसऱ्या दिवसअखेर १ बाद १९९ धावा करु शकला आहे. त्याचबरोबर अजूनही ४२ धावांनी पिछाडीवर आहे. श्रीलंकेकडून दुसऱ्या डावात असिता फर्नांडोने एक विकेट घेतली. श्रीलंका आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकमेव कसोटी सामना 2 फेब्रुवारीपासून सुरू झाला. श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तान संघाने पहिल्या डावात १९८ धावा केल्या होत्या. श्रीलंकेकडून विश्वा फर्नांडोने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर असिता फर्नांडो आणि प्रभात जयसूर्याने ३-३ विकेट्स घेतल्या. श्रीलंकेने पहिल्या डावात ४३९ धावा केल्या आणि २४१ धावांची आघाडी घेतली. अफगाणिस्तानने दुसऱ्या डावात तिसऱ्या दिवसअखेर ७५ षटकानंतर एक गडी गमावून १९९ धावा केल्या आहेत.२२ वर्षांच्या पुतण्याने ३५ वर्षांच्या काकांना कसोटी पदार्पणाची कॅप दिली हे क्रिकेटच्या मैदानावरील हे दृश्य स्वतःच मनोरंजक होते. एवढेच नाही तर काका-पुतण्याने अफगाणिस्तानसाठी डावाची सलामीही दिली. पहिल्या डावात ही जोडी काही विशेष करू शकली नाही, पण दुसऱ्या डावात दोघांमध्ये शतकी भागीदारी झाली. नूर अली झाद्रान आणि इब्राहिम झाद्रान यांनी पहिल्या विकेटसाठी १०६ धावांची भागीदारी केली. ही भागीदारी नूरच्या विकेटसह तुटली. त्याने ४७ धावा केल्या.नूर अली झाद्रानने अफगाणिस्तानसाठी १४ वर्षे क्रिकेट खेळले आहे, पण या १४ वर्षांच्या करिअरमध्ये तो कसोटी पदार्पण करू शकला नाही. त्याला श्रीलंकेविरुद्ध अफगाणिस्तान कसोटी संघात पदार्पण करण्याची संधी मिळाली. विशेष म्हणजे त्याचा पुतण्या इब्राहिम झाद्रानने त्याला पदार्पणाची कॅप दिली. नूर अलीचा आणखी एक पुतण्या अफगाणिस्तानसाठी क्रिकेट खेळतो. त्या खेळाडूचे नाव आहे मुजीब उर रहमान. इब्राहिम झाद्राने श्रीलंकेविरुद्ध खेळल्या जात असलेल्या कसोटी सामन्यातील तिसऱ्या दिवशी शतक झळकावले. त्याने २१७ चेंडूचा सामना करताना ११ चौकारांच्या मदतीने नाबाद १०१ धावा केल्या.

### जयसूर्याने 3-3 विकेट्स घेतल्या

» त्यामुळे अफगाणिस्तानचा संघ दुसऱ्या डावात तिसऱ्या दिवसअखेर १ बाद १९९ धावा करु शकला आहे. त्याचबरोबर अजूनही ४२ धावांनी पिछाडीवर आहे. श्रीलंकेकडून दुसऱ्या डावात असिता फर्नांडोने एक विकेट घेतली.श्रीलंका आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकमेव कसोटी सामना 2 फेब्रुवारीपासून सुरू झाला. श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तान संघाने पहिल्या डावात १९८ धावा केल्या होत्या. त्याचबरोबर असिता फर्नांडो आणि प्रभात जयसूर्याने ३-३ विकेट्स घेतल्या.

# जैस्वालचं क्रिकेटमधील आयुष्य बदलून गेलं!

## जैस्वालने पहिल्याच कसोटी सामन्यात त्याने 171 धावांची खेळी खेळली

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**दुलीप ट्रॉफीच्या फायनल कोईम्बतूरमध्ये पार पडली. हा सामना पश्चिम विभाग आणि दक्षिण विभाग यांच्यात झाला. अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली पश्चिम विभागाने हा सामना 294 धावांनी जिंकला. या सामन्यात यशस्वी जैस्वालही खेळत होता. पहिल्या डावात केवळ 1 धावा करणाऱ्या जयस्वालने दुसऱ्या डावात 265 धावा केल्या.**



या कारणामुळे त्याला 'प्लेअर ऑफ द मॅच' देण्यात आला. हा सामना क्रिकेटच्या इतिहासाच्या पानात नोंदला गेला तो निकाल आणि त्याच्या चमकदार कामगिरी तसेच यशस्वीच्या वागण्यामुळे. पश्चिम विभागाचा कर्णधार अजिंक्य रहाणेने आपल्या संघातील खेळाडू यशस्वी जयस्वालला मैदानाबाहेर पाठवले. यशस्वी जैस्वालच्या अनुशासनहीन वृत्तीमुळे रहाणेला हे पाऊल उचलावे लागले.यशस्वी वारंवार दक्षिण विभागाच्या फलंदाजांची, विशेषतः रवी तेजाची स्लेजिंग करत होता. पंचांनी यशस्वीला दोन-तीन वेळा ताकीदही दिली होती. डावाच्या 57 व्या षटकात यशस्वीने पुन्हा तेच केले तेव्हा पंचांनी कर्णधार रहाणेशी बराच वेळ संभाषण केले, त्यानंतर यशस्वीला मैदान सोडावे लागले. विशेष बाब म्हणजे पंचांनी पश्चिम विभागाला पर्यायी क्षेत्ररक्षक ठेवण्याची परवानगी दिली नाही, ज्यामुळे त्यांना काही षटकांसाठी 10 खेळाडूंसह मैदानात राहावे लागले. अजिंक्यच्या या भूमिकेचा यशस्वीवर चांगलाच परिणाम झाल्याचे मानले जाते. त्याच्या कारकिर्दीतही बरेच बदल झाले. ते वर्ष होते 2022. IPL 2022 च्या 10 सामन्यांमध्ये 25.80 च्या वेगाने 258 धावा करणाऱ्या यशस्वीने पुढच्याच वर्षी म्हणजेच IPL 2023 मध्ये चमकदार कामगिरी केली.

### यशस्वीच्या संघर्षाची कहाणी

» आयपीएल 2023 मध्ये यशस्वी जैस्वालने 14 सामन्यात 625 धावा केल्या. या काळात त्याची सरासरी 48.08 आणि स्ट्राइक रेट 1632.61 होता.यशस्वी जैस्वालला आयपीएल 2023 मध्ये कामगिरी केल्याबद्दल बक्षीस मिळाले.भदोहीहून मुंबईत पोहोचलेल्या यशस्वीची कहाणी अतिशय हृदयस्पर्शी आहे. तो एका दुध डेअरीत काम करायचा आणि पाणीपुरीह सुद्धा विकत होता. 28 डिसेंबर 2001 रोजी भदोही, यूपी येथे जन्मलेला यशस्वी वयाच्या 12व्या वर्षी मुंबईत पोहोचला आणि आझाद मैदानावर क्रिकेटची ABCD शिकली. इथं तो मुस्लिम युनायटेड क्लबचे प्रशिक्षक इम्रान सिंह यांच्या संपर्कात आला.